**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सार्वजनिक आरोग्य खाते**

**परिपत्रक**

**एचओ/४४०७२/प. दि.**

विषय : विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यपध्दत.

संदर्भ : अति.आ./पउ/एच/७५८३ दि.२४.०२.२०१६.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत नागरीकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, नागरीकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्राचा अर्ज विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रात प्रत्यक्ष जाऊन अथवा ऑनलाईन प्राप्त करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे:-

**<u>नागरी सुविधा केंद्रामध्ये करण्यात येणारी कार्यवाही / कार्यपध्दती</u>**

अर्जदार नागरी सुविधा केंद्रात आल्यानंतर नागरी सुविधा केंद्रातील कार्यरत CFC-CRE (Customer Relation Executive) विहीत नमुन्यातील Mannual अर्ज (प्रपत्र 'ड') ची प्रत printout काढून अर्जदारास भरावयास देतील. अर्जदार सदर अर्ज भरून CFC-CRE कडे सादर करतील.

CFC-CRE पुढील बाबी करतील.

१. Marriage Application electronic Form भरतील (Mannualy अर्जदाराने भरुन दिलेला अर्ज बघून ).

२. CFC-CRE आवश्यक कागदपत्रांच्या(As per list of documents attached in memorandum D) साक्षांकीत छायांकित प्रती अर्जदाराकडून प्राप्त करून मूळ कागदपत्रांबरोबर पडताळणी करतील.

3. CFC-CRE स्कॅनर उपलब्ध नसल्यास अर्ज व कागदपत्रांच्या साक्षांकीत छायांकित प्रती प्राप्त करून विवाह निबंधक (वैद्यकीय आरोग्य अधिकारी) यांच्या कार्यालयात पाठवतील.

५.CFC-CRE अर्जदारास संपूर्ण माहिती भरलेला Marriage Application Form ची PDF printout काढून देतील ज्यावर Marriage Registration no. नमूद केलेला असेल.

६. अर्जदाराकडून अर्जाचे शुल्क रोख रक्कम रु.१६/- प्राप्त करतील व रु.१६/- ची शुल्क रकमेची पावती (ज्यामध्ये विवाह निबंधकास भेटण्याचा दिनांक व वेळ appointment date & time नमूद केलेला असेल) )

PDF Marriage Application Form वर दिलेल्या छापील सूचनेनुसार अर्जदार

अर्जदारांना विनंती करण्यात येते की , त्यांनी अर्जामध्ये दिलेली /भरलेली माहिती(स्पेलिंग साठी)तपासून पहावी. तसेच अर्जामधील माहितीमधील एखाद्या दुरुस्तीसाठी भेटण्याच्या दिवशी संबंधित पुरावे घेऊन निबंधकाच्या लक्षात आणून द्यावी.अर्ज विवाह निबंधकांनी मंजूर केल्यानंतर , विवाह नोंदणी प्रमाणपत्रामध्ये कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही ,याची अर्जदारांनी कृपया नोंद घ्यावी.

१. अर्जावर पुरोहित / काझी यांची स्वाक्षरी घेऊन ठेवतील. तसेच, वधू-वर व ३ साक्षीदार यांचे छायाचित्र चिकटवून ठेवतील.

२. सर्व मूळ कागदपत्रे आणि सर्व मूळ कागदपत्रांच्या १ साक्षांकित छायांकित प्रत तयार करून ठेवतील.

३. भेटण्याच्या दिवशी विवाह निबंधकासमोर वधू-वर व ३ साक्षीदार व्यक्तीश: उपस्थित रहतील. भेटण्याच्या दिवशी अर्जदार विवाह निबंधकास पुढील बाबी सादर करतील.

↓

१. मूळ PDF Marriage Application Form ज्यावर पुरोहित / काझी यांची स्वाक्षरी असेल.
२.रु १६/-शुल्क पावती
३. सर्व मूळ कागदपत्रे आणि सर्व मूळ कागदपत्रांच्या १ साक्षांकित छायांकित प्रत
४. वर-वधू व ३ साक्षीदार विवाह निबंधकाच्या समोर मूळ PDF Marriage Application Form छायाचित्रांच्या खाली सही करतील .

↓

विवाह निबंधक वरील सर्व बाबींची पडताळणी करुन
1. Marriage Registration application approve / reject / hold /
2.अर्ज hold केल्यास अर्जदाराला कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी २ दिवसांचा अवधी दिलेला आहे. अर्जदाराने सदर पुर्तता न केल्यास त्यांचा अर्ज आपोआप सॅप सिस्टीम मधून reject केला जाईल अशा वेळी अर्जदार पुन्हः अर्ज करु शकतील.
३. विवाह निबंधक मूळ PDF Marriage Application Form व सर्व मूळ कागदपत्रांच्या १ साक्षांकित छायांकित प्रत अर्जदाराकडून प्राप्त करुन निबंधक कार्यालयात जतन करतील.

↓

अर्ज मंजूर झाल्यानंतर अर्जदार नागरी सुविधा केंद्रामध्ये येऊन CFC - CRE (Customer Relation Executive) यांना भेटतील. CFC - CRE (Customer Relation Executive) हे अर्जदाराकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र शुल्क प्राप्त करतील व सॅप प्रणालीमधून विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व शुल्क पावतीची प्रत काढून अर्जदारास प्रदान करतील.

## <u>ऑनलाईन करावयाची कार्यवाही / कार्यपध्दती</u>

अर्जदाराला ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयचा असल्यास पुढीलप्रमाणे मनपाच्या संकेतस्थळावर सोय उपलब्ध करुन दिली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे "आपले सरकार.महाऑनलाईन" ला खालील संकेतस्थळ जोडले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर (portal mcgm.gov.in)

↓

नागरी सुविधा (Citizen services)

↓

आरोग्य सुविधा (Health services)

↓

विवाह नोंदणी (Marriage application)

↓

- ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यापूर्वी कृपया सूचनापत्र वाचावे. (Please read instructions before submitting online application) ज्यामध्ये अर्जदारास आवश्यक ती कागदपत्रांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल, त्याप्रमाणे अर्जदार कागदपत्रे Scan करुन तयार ठेवतील.

↓

येथे अर्ज करावा (Apply here)

↓

अर्जदार ऑनलाईन अर्ज पूर्ण भरतील

↓

अर्जदारने सर्व आवश्यक कागदपत्रे(ज्ञापन 'ड' मध्ये आवश्यक कागदपत्रांची यादी नमूद केली असून त्याची कृपया नोंद घ्यावी. in Memorandum D) Scan करुन अर्जासोबत upload करावयाचे आहे. त्यासाठी अर्जदारास upload टॅबची सुविधा अर्जासोबत उपलब्ध करुन अर्जदाराकडे Scanned कागदपत्रे उपलब्ध नसतील तर सर्व कागदपत्रांची १ साक्षांकित छायांकित प्रत निबंधकास भेटण्याच्या दिवशी सादर करु शकतात.

↓

submit करतील

↓

अर्ज शुल्क रु.१६/- ऑनलाईन credit / debit card द्वारे भरु शकतील. तसेच,

↓

अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या त्यांच्या ई-मेल आयडी (अर्जदाराला अर्जावर ईमेल आयडी नमूद करणे अनिवार्य आहे) वर पुढील बाबींची PDF printout घेण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे.

१. संपूर्ण माहिती भरलेला Marriage Application Form ज्यावर Marriage Registration no. नमूद केलेला असेल.अर्जदारांना विनंती करण्यात येते की , त्यांनी अर्जामध्ये दिलेली /भरलेली माहिती(स्पेलिंग साठी)तपासून पहावी. तसेच अर्जामधील माहितीमधील एखाद्या दुरुस्तीसाठी भेटण्याच्या दिवशी संबंधित पुरावे घेऊन निबंधकाच्या लक्षात आणून द्यावी.अर्ज विवाह निबंधकांनी मंजूर केल्यानंतर , विवाह नोंदणी प्रमाणपत्रामध्ये कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही ,याची अर्जदारांनी कृपया नोंद घ्यावी.

२. रु.१६/- ची शुल्क रकमेची पावती (ज्यामध्ये विवाह निबंधकास भेटण्याचा दिनांक व वेळ नमूद केलेला असेल) (appointment date & time)

PDF Marriage Application Form वर दिलेल्या छापील सूचनेनुसार अर्जदार

१. अर्जावर पुरोहित / काझी यांची स्वाक्षरी घेऊन ठेवतील. तसेच, वधू-वर व ३ साक्षीदार यांचे छायाचित्र चिकटवून ठेवतील.

२. सर्व मूळ कागदपत्रे आणि सर्व मूळ कागदपत्रांच्या १ साक्षांकित छायांकित प्रत तयार करुन ठेवतील.

३. भेटण्याच्या दिवशी विवाह निबंधकासमोर वधू-वर व ३ साक्षीदार व्यक्तीश: उपस्थित रहतील.

↓

भेटण्याच्या दिवशी अर्जदार विवाह निबंधकास पुढील बाबी सादर करतील.

१. मूळ PDF Marriage Application Form ज्यावर पुरोहित / काझी यांची स्वाक्षरी असेल.

२.रु १६/- शुल्क पावती

३. सर्व मूळ कागदपत्रे आणि सर्व मूळ कागदपत्रांच्या १ साक्षांकित छायांकित प्रत

४. वर-वधू व ३ साक्षीदार विवाह निबंधकाच्या समोर मूळ PDF Marriage Application Form छायांचित्राच्या खाली सही करतील .

↓

विवाह निबंधक वरील सर्व बाबींची पडताळणी करुन त्यांच्या MOH Log in ID मधून

1. Marriage Registration application approve / reject / hold

2 अर्ज hold केल्यास अर्जदाराला कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी २ दिवसांचा अवधी दिलेला आहे. अर्जदाराने सदर पुर्तता न केल्यास त्यांचा अर्ज आपोआप सॅप सिस्टीम मधून reject केला जाईल अशा वेळी अर्जदार पुन्ह: अर्ज करु शकतील.

३. विवाह निबंधक मूळ PDF Marriage Application Form व सर्व मूळ कागदपत्रांच्या १ साक्षांकित छायांकित

| |
|---|
| प्रत अर्जदाराकडून प्राप्त करुन निबंधक कार्यालयात जतन करतील. |

↓

| |
|---|
| अर्ज मंजूर झाल्यानंतर अर्जदारास पुन्हः मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर (portal mcgm.gov.in) जाऊन Payment Recipiet Tab ला जाऊन ऑनलाईन पध्दतीने credit / debit card द्वारे विवाह नोंदणी शुल्क भरावे लागेल. सदर शुल्क भरल्यानंतर अर्जदारास त्यांच्या ई-मेल आयडीमध्ये सदर शुल्काची पावती व विवाह नोंदणी प्रमाणपत्र यांचे PDF printout घेता येईल. |

-सही-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**